वाचले :-1) नवजीवन डेव्हलपर्स अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सर्विसेस तर्फे भागीदार श्री. विशाल इंदरचंद जैन वगैरे-4 सर्व रा.शिरपुर ता.शिरपूर जि.धुळे यांचा दि.03/11/2021 चा अर्ज.

2) म.सहाय्यक संचालक नगर रचना धुळे यांचेकडील पत्र-जा.क्र./ससंनर-धुळे/बांप/मौजे मांडळ ता.शिरपूर जि.धुळे/ग.नं. 26 पै./भू.क्र. 58 व 59/864 दिनांक 24/06/2022.

3) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 18 मधील पोटकलम तीन.

4) मा.जिल्हाधिकारी सो.धुळे यांचेकडील आदेश क्र.ब/कक्ष-1/बिनशेती/कावि/195/2017 दिनांक 29/03/2017.

5) तहसिलदार शिरपूर यांचेकडील अहवाल क्रमांक/गावठाण/कावि/411/2022 दिनांक 24/07/2022.

क्रमांक/बांधकाम परवानगी/S.R./19/कावि/358/2022
उपविभागीय अधिकारी कार्यालय,शिरपूर भाग शिरपूर
शिरपूर दिनांक 14/10/2022

आदेश

ज्याअर्थी अर्जदार नवजीवन डेव्हलपर्स अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सर्विसेस तर्फे भागीदार श्री. विशाल इंदरचंद जैन वगैरे-4 सर्व रा.शिरपुर ता. शिरपूर जि.धुळे यांनी मौजे मांडळ ता.शिरपूर जि.धुळे शिवारातील बिनशेती ग.नं. 26/1/ड/2 मधील प्लॉट नं. 58 व 59 चे एकुण क्षेत्र 499.93 चौ.मी. क्षेत्रास रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी मिळणेकामी उपोद्घातातील अ.क्र.1 विनंती केली आहे.

याकामी म.सहाय्यक संचालक नगररचना धुळे यांचेकडील पत्र दिनांक 24/06/2022 अन्वये रेखांकन मंजुरीसह नाहरकत दाखल सादर करण्यात आला आहे सदर पत्रात नगररचनाकार धुळे यांनी अर्जदार यांना बांधकामाचे रेखांकन मंजूर करुन विहित अटी व शर्तीस अधिन राहून रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी मिळणेकामी नाहरकत दाखला इकडील कार्यालयास सादर केला आहे.तसेच ग्रामपंचायत मांडळ ता.शिरपूर यांनी देखील याबाबत नाहरकत दाखला सादर केला आहे.

ज्याअर्थी अर्जदार यांनी उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक/बीसीए-2009/ प्र.क्र.108/कामगार 7-अ मुंबई-32 दिनांक 17/06/2010 नुसार बांधकाम मुल्यांकनाचे 1% उपकर रक्कम रुपये 2,00,075/- दि. 13/10/2022 रोजी बँक ऑफ इंडीया शाखा शिरपूर येथे चलनादवारे शासकीय खजिन्यात शासन जमा केलेली आहे.

त्याअर्थी मी उपविभागीय अधिकारी शिरपूर भाग शिरपूर उपोद्घातातील अ.नं.4अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन नवजीवन डेव्हलपर्स अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सर्विसेस तर्फे भागीदार श्री. विशाल इंदरचंद जैन वगैरे-4 सर्व रा.शिरपुर ता. शिरपूर जि.धुळे यांनी मौजे मांडळ ता.शिरपूर जि.धुळे शिवारातील बिनशेती ग.नं. 26/1/ड/2 मधील प्लॉट नं. 58 व 59 चे एकुण क्षेत्र 499.93 चौ.मी. क्षेत्रास रहिवास प्रयोजनार्थ खालील अटी व शर्तीचे अधिन राहून बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

1) या कार्यालयाकडील बिनशेती व सनद आदेशातील विहित केलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

2) म.सहा.संचालक नगररचना धुळे यांचेकडील दिनांक 24/06/2022 चे मंजूर रेखांकन नुसार बांधकाम करणे अनिवार्य आहे. त्यात काही फेरबदल करावयाचे झाल्यांस त्यास स्थानिक प्राधिकरणाची पुर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे.

3) भूखंडाच्या हद्दीपासुनची इमारती पर्यंतची मोजमाप नकाशात दर्शविलेल्या प्रमाणे असावीत व त्या जागेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

4) म.सहा.संचालक नगररचना धुळे यांचेकडील अटी नुसार लगतच्या मिळकत धारकांचे जागेत हवा,उजेड,वास यांची बाधा येणार नाही याची दक्षता घेणे भूखंडधारकांवर राहिल.

5) सांडपाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल याची दक्षता घेण्यात यावी.

6) जागेवर जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यावर सदरहू बांधकाम हे मंजूर केलेल्या बांधकाम नकाशाप्रमाणे असल्याबाबत खात्री करुन स्थानिक प्राधिकरणाकडून तसा दाखला घेणे आवश्यक राहील.

7) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर वास्तु विशारद / स्थापत्य अभियंता यांचेकडील पुर्णत्वाचे प्रमाणपत्रासह इमारत वापर परवानगीसाठी अर्ज करणे बंधनकारक आहे व तसा वापर परवाना मिळाल्यावर प्रत्यक्ष वापर करता येईल.

8) प्रस्तावित बांधकाम फक्त रहिवास प्रयोजनार्थ वापर अनुज्ञेय राहिल.

9) अर्जदार यांनी भुखंडाच्या मोकळया जागेत किमान 5 झाडे लावणे बंधनकारक राहील.

स्वाक्षरी/-xxx
(प्रमोद भामरे)
उपविभागीय अधिकारी
शिरपूर भाग शिरपूर

प्रत :- नवजीवन डेव्हलपर्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सर्विसेस तर्फे भागीदार श्री.विशाल इंदरचंद जैन वगैरे-4 सर्व रा.शिरपुर ता.शिरपूर जि.धुळे यांना माहितीसाठी.
प्रत :- मा.जिल्हाधिकारी सो.धुळे (महसूल-शाखा) यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत :- तहसिलदार शिरपूर यांचेकडेस माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत :- ग्रामसेवक ग्रामपंचायत मांडळ ता.शिरपूर जि.धुळे यास माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

16.10.22
(प्रमोद भामरे)
उपविभागीय अधिकारी
शिरपूर भाग शिरपूर